▶ वर्ष–३
■ अंक–११


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १६ ऑक्टोबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# दिव्यातील खाजगी हॉस्पिटलच्या मनमानी कारभाराचे मनसेकडून वाभाडे



अध्यक्ष: श्री. राजसाहेब ठाकरे

महाराष्ट्र नवनिर्माण सेना

श्री.तुषार भास्कर पाटील
शहर अध्यक्ष, दिवा

दिनांक : १३/१०/२०२३

प्रति,
मा.श्री.अभिजित बांगर
आयुक्त, ठाणे महानगरपालिका
ठाणे – ४००६०२

विषय - दिव्यातील सर्व खाजगी रुग्णालयांचे ऑडिट करून त्यांच्या बिलिंग सिस्टीम तपासण्यासंदर्भात

सन्माननीय महोदय,

दिवा शहरातील बहुतांश सर्वच खाजगी रुग्णालयांच्या बाबतीत नेहमीच आमच्या कार्यालयात वरचेवर तक्रारी येत असतात. दिवा शहरातील खाजगी रुग्णालयांकडून होणारी सर्वसामान्य जनतेच्या लूट हा मोठा चिंतेचा विषय आहे. दिव्यात महानगरपालिकेचे रुग्णालय अथवा आरोग्यकेंद्र नसल्याने सर्वसामान्य लोकं ही याच खाजगी हॉस्पिटलचा आधार घेत असतात. आज दिव्यात राहणारी बहुतांश जनता ही मध्यमवर्गीय आणि गरीब आहे त्यामुळे खाजगी रुग्णालयांच्या या लुटीचा थेट परिणाम हा या मध्यमवर्गावर दिसून येतो.

चारच दिवसांपूर्वी दिव्यातील आधार रुग्णालयासंदर्भात आमच्या सहकाऱ्यांनी मा. उपायुक्त श्री.उमेश बिरारे (आरोग्य विभाग) आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतना नितीन के. यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. ते पत्र संदर्भासाठी पुढे जोडत असून, सदर प्रकरणात तक्रारकर्ते श्री.प्रवीण मोरे यांना मेडिक्लेम साठी लागणारी विस्तृत बिलाची प्रत(Itemized Bill) मिळवण्यासाठी डॉ. निलेश सरोदे आणि डॉ. सुनीता सरोदे या डॉक्टर दाम्पत्याकडून GST च्या नावाखाली रुग्णाच्या नातेवाईकांकडून ३०% रक्कम जास्तीची रक्कम उकळण्याच्या प्रकार उघडकीस आला. रुग्णालयाला GST लागत नसल्याचे आमच्या पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर दाम्पत्याच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी लगेच यु-टर्न घेऊन आयकर (Income Tax) लागत असल्याचे सांगितले तसेच तो न दिल्यास विस्तृत बिल मिळणार नाही असे देखील निक्षून सांगितले. इतक्यावरच न थांबता सदर डॉक्टर महाशयांनी बिनदिक्कतपणे लेखी स्वरूपात हे लिहून देखील दिले. म्हणजे आपलं कोणी काहीच वाकडं करू शकणार नाही याचा त्यांना असलेला विश्वास विचार करायला लावणारा आहे.

रुग्णालयांना GST लागत नसल्याचे माहिती असूनसुद्धा केवळ आपले खिसे भरण्यासाठी रुग्णांकडून जास्तीचे पैसे उकळले जातायत. सर्वसामान्य लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांना उलटसुलट चुकीचे कायदे दाखवून लोकांची अक्षरशः लुबाडणूक दिव्यातील खाजगी रुग्णालयांकडून केली जात आहे. दिव्यातील अनेक रुग्णालयांमध्ये हॉस्पिटलच्या नावाखाली चार बेड टाकून फक्त लोकांना लुटायचे काम सुरू आहे. लोकांना औषधे त्यांच्याच हॉस्पिटल मधून घ्यायची सक्ती केली जाते. दिव्यातील एकही हॉस्पिटलमध्ये आग प्रतिबंधात्मक उपाययोजना असलेली दिसून येणार नाही. बेडचे आकारले जाणारे दर, हे तर ठाण्याच्या ज्युपिटर हॉस्पिटललाही लाजवतील असे आहेत. कित्येक रुग्णालयां मधील डॉक्टरांकडे योग्य पदवीही नसेल अशी ठाम शक्यता आहे. त्यामुळे या सर्व बाबींची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी वरील विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण आरोग्य विभागाला तसे चौकशीचे आदेश द्यावेत ही विनंती.

आपला नम्र
तुषार पाटील
तुषार भास्कर पाटील

प्रत रवाना
१)मा.श्री.प्रमोद(राजू) रतन पाटील,विधानसभा सदस्य - कल्याण ग्रामीण विधानसभा

कार्यालय: आमदार कार्यालय, शॉप नं. २, चंद्रांगण रेसिडेन्सी, दिवा-शिळ रोड, दिवा स्टे.(पूर्व)
दूरध्वनी: ७९७७५५३५३५ / ९८२०६९८१११

## मेडीक्लेमसाठी पक्के बिल मागणाऱ्या रुग्णाकडे वाढीव रक्कम मागणाऱ्या डॉक्टरची पालिका आयुक्तांच्या दौऱ्यातच लेखी पत्राद्वारे तक्रार!

**दिवा न्यूज स्पेशल स्टोरी**

दिव्यातील खाजगी हॉस्पिटलच्या मनमानी कारभाराचे वाभाडे दिवा मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांनी पालिका आयुक्तांच्या दौऱ्यात काढले. एक तर दिव्यात पालिकेची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम नसल्याने खाजगी रुग्णालयाकडून येथील सर्वसामान्य नागरिकांची लूट होत असल्याचे तुषार पाटील यांनी पालका आयुक्तांच्या निदर्शनात आणून दिले.



(पान ५ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३



## रस्त्यावर झाड कोसळले, कोणतीही हानी नाही

**ठाणे:** कॅडबरी जंक्शन जवळ, पूर्व द्रुतगती महामार्ग, या ठिकाणी विवियाना मॉल कडे जाणाऱ्या रस्त्यावरती झाड पडल्याची घटना शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी यांनी धाव घेत तो झाड कापून रस्त्याच्या एका बाजूला केल्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आल्याचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सांगितले.

# भाजपचे विजय भोईर यांच्या माध्यमातून आधार कार्ड शिबिराचे आयोजन

**दिवा:-** भारतीय डाक विभाग , भारतीय जनता पार्टी दिवा तसेच आता तरी जागा हो दिवेकर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ ते ऑक्टोबर पर्यंत आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये पत्ता बदल, मोबाईल नंबर बदल, ५ वर्षा खालील मुलाचे नवीन आधार कार्ड फ्री मध्ये काढणे, जन्म तारीखेत बदल, शिवाय पोस्टाचे बचत खाते, सुकन्या योजना, व अश्या इतरही योजना याबाबत नागरिकांना लाभ मिळणार आहे.

यासाठी भारतीय डाक विभागाचे कर्मचारी आणि भारतीय जनता पार्टी चिटणीस विजय अनंत भोईर यांची टीम तसेच दिवा मंडळाचे अध्यक्षांची टीम,कार्यकर्ते यांनी या शिबिरासाठी सहकार्य केले.









## ठाण्यातील गंगुबाई संभाजी शिंदे रुग्णालयात गॅस गळती
### कोणालाही दुखापत नाही

ठाणे: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मातोश्री स्वर्गीय गंगुबाई संभाजी शिंदे यांच्या नावाने सुरू असलेल्या रुग्णालयाच्या आवारातील ३९० किलो वजनी ऑक्सिजन गॅस सिलिंडरमधून मोठ्या प्रमाणात गळती झाल्याची घटना रविवारी मध्यरात्री सव्वा बारा ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या गळतीमुळे रुग्णालयास आजूबाजूच्या परिसरात एकच खळबळ उडाली होती. या गळतीचा रुग्णालयामधील रुग्णांना कोणताही त्रास झालेल्या नाही. तर प्रेशर वाढल्यामुळे सेफ्टी वॉल बेंड होऊन ऑक्सीजन गॅस गळती झाली असून काही तासात परिस्थिती नियंत्रणात आल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

वागळे इस्टेटमधील किसननगर नंबर ३, भटवाडी येथे शनिवारी सायंकाळी घरगुती गॅस सिलिंडर होऊन आग लागली होती. त्यामध्ये दोघे जखमी झाले असताना, काही तासांच्या अंतरावर त्याच वागळे इस्टेट परिसरातील श्रीनगर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वर्गीय मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे रुग्णालयाच्या आवारात असलेल्या

ऑक्सीजन गॅस सिलिंडर रूम मधील गॅसेस प्रा.लि. कंपनीचा ३९० किलो वजनी ऑक्सीजन गॅस सिलिंडरमधून रविवारी मध्यरात्री मोठ्या प्रमाणात गॅस गळती होण्यास सुरुवात झाली होती. याची माहिती मिळताच घटनास्थळी रुग्णालयामधील ऑक्सीजन गॅस ऑपरेटर, सुरक्षारक्षक, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तर, तातडीने रुग्णालयामधील ऑक्सीजन गॅस सिलिंडर ऑपरेटर यांनी ऑक्सीजन गॅस सिलिंडरचा प्रेशर नियंत्रणात आणून ऑक्सीजन गॅस गळती पूर्णपणे थांबली आहे. त्यातच ऑक्सीजन गॅस रूम मध्ये अजून एक ३९० किलो वजनी ऑक्सीजन सिलेंडर असल्यामुळे त्या रुग्णालयामधील ऑक्सीजन गॅस पुरवठा खंडीत होत नव्हता. दरम्यान या रुग्णालयामधील रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास झालेला नाही.तसेच सुरक्षेच्या कारणास्तव रुग्णालयातील उपस्थित असलेले प्रशासक, व सुरक्षा रक्षक यांना त्या कंपनीचे असलेले ऑक्सीजन गॅस सिलिंडरची कंपनीकडून देखभाल करून घेण्यास सांगितले.




## ट्रान्सफॉर्मर केबिनचा स्लॅब कोसळला

**ठाणे:** तीन हात नाका जवळ, लाला बहादूर शास्त्री रोड, या ठिकाणी असलेल्या नंदनवन इंडस्ट्रिअल इस्टेट मधील ट्रान्सफॉर्मर केबिनचा स्लॅब कोसळल्याची घटना शुक्रवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसली तरी केबीनमधील ट्रान्सफॉर्मरचा विद्युत पुरवठा खंडित करून धोकादायक भाग तातडीने काढण्यात आला आहे. त्यानंतर विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला. ट्रान्सफॉर्मर केबिनचा स्लॅब कोसळल्याची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. आणि ट्रान्सफॉर्मरवर पडलेला स्लॅब पोकलेन ब्रेकरच्या साहाय्याने तोडून बाजूला केला.

## दिवा डोंबिवली बस सेवा सुरू

दिवा:- दिवा ते डोंबिवली स्टेशन यादरम्यान ठाणे महानगरपालिका परिवहन मार्फत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. गुरुवारपासून या बस सेवेचा शुभारंभ झाला.

दिवा शिवसेनेचे शहर प्रमुख माजी उपमहापौर रमाकांत मढवी, उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी दिवा शहरातील शिवसेनेचे सर्व माजी नगरसेवक,पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने व पुढाकाराने ही बस सेवा सुरू करण्यात आल्याचे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी यावेळी बोलताना सांगितले.या बस सेवेमुळे दिवा डोंबिवली दरम्यान रस्ता मार्गे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फायदा होणार असून दिवा शहरातील गणेश नगर, आगासन, मानपाडा, बेतवडे या भागात जाणाऱ्या नागरिकांनाही या बसचा फायदा होणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

## मुंब्र्यात कचरा पेटला

**ठाणे:** मुंब्रा- कौसा येथील विस्टा व्हॅली इमारतीच्या बाजूला टाकण्यात येणारा कचऱ्याला शनिवारी पहाटे पावणे चार ते चार वाजण्याच्या सुमारास आग लागली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. तर ही आग जवळपास अर्ध्यातासात नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. यावेळी एक फायर इंजिन आणि रेस्क्यू व्हॅन पाचारण केली होती अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# पाहणी दौरा नको, पाणी दौरा हवा!

दिवा न्यूज सडेतोड/सुहास खंडागळे

पालिका आयुक्तांनी शुक्रवारी दिव्यात विविध विकासकामांचा पाहणी दौरा केला. दिव्यातील वस्तुस्थिती पाहण्यासाठी आयुक्तांना वेळ मिळाला यासाठी सर्वप्रथम दिव्यातील पाच लाख जनतेने त्यांना धन्यवाद द्यायला हवेत.कारण दिवा हा पालिका क्षेत्रात येतो,तो ठाणे महापालिकेचा भाग आहे हे काहीकाही वेळा ठाण्यातील प्रशासन विसरत असते.

खरं तर पालिका आयुक्तांनी असा पाहणी दौरा करून फारसा फरक पडेल असे चित्र नाही.काल आयुक्तांनी दौरा केला आणि आज सगळं चकाचक होईल ही अपेक्षाच फोल आहे.पालिका आयुक्तांच्या दौऱ्यातील काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेतले तर किती दिरंगाई दिव्यातील प्रश्न सोडविण्यासाठी होते याची प्रचिती येईल. दिवा पूर्व पश्चिम उड्डाणपूल मागील ५वर्षाहून अधिक काळ रखडला आहे. तेव्हाच्या शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्या हस्ते या उड्डाणपूल चे भूमिपूजन झाले आणि आताच्या शिवसेनेचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळातही हा ब्रीज पूर्णत्वास जाऊ शकला नाही.

वाहतूक कोंडी,पार्किंग समस्या असे अनेक प्रश्न या ब्रिजच्या अर्धवट कामामुळे निर्माण झाले आहेत.

दुसरीकडे पालिका आयुक्तांनी काही अन्य प्रकल्प गतिमान करण्याच्या सूचना केल्या आहेत. अशाप्रकारे गतिमान सूचना पाहणी दौऱ्यात करण्याचा ट्रेंड काही नवा नाही.ऑन दि स्पॉट सूचना दिल्या हे ऐकायला बरं वाटतं मात्र त्याच्या अंमलबजावणी ची वाट सामान्य माणसाला बराच काळ पहावी लागते. मुख्यमंत्र्यांनी पाणी योजनेचे उद्घाटन केले तेव्हा दिव्यातील पाणी प्रश्न जणू सुटला असेच वातावरण होते मात्र आज ५ महिने उलटले तरी पाणी प्रश्न सुटू शकलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.प्रमुख पदावर बसणारी माणसे घोषणा करतात,जनहीताचे निर्णय घेतात पण अंमलबजावणी ज्या व्यवस्थेने करायची आहे ती व्यवस्था नीट काम करते की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे.

आजच्या घडीला मागील १५ वर्षे दिवा शहराला भेडसावणारा सर्वात मोठा प्रश्न कोणता असेल तर तो पाणी प्रश्न आहे.दिव्यात राहणारा सामान्य माणूस हा नोकरदार वर्ग आहे.त्यांच्या पगारातील २ ते ३ हजार रुपये पाण्यासाठी टँकरवर खर्च होऊ लागले तर त्याचे जीवन आनंदी कसे होईल?याचा विचार पालिका प्रशासनाने करायला हवा. दिव्यातील पाणी प्रश्न निकालात काढण्यासाठी ज्या उपाययोजना करण्यात आल्या त्या कितपत यशस्वी ठरल्या याचे ऑडिट व्हायला हवे. शहरातील नागरिकांना किमान पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पालिका प्रशासन का अपयशी ठरत आहे याकडे पालिका आयुक्तांनी लक्ष द्यायला हवे.अगदी ग्रामीण भागाला जलजीवन मिशन अंतर्गत प्रति मानसी प्रति दिवशी ५५ लिटर हक्काचे पाणी देण्याची योजना केंद्र सरकार राबवत आहे.शहरी भाग असणाऱ्या दिव्यात मात्र २ ते ३ दिवस आड सुद्धा लोकांना पाणी का मिळत नाही याचा विचार प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी करायला हवा...पालिका आयुक्तांना दिव्यात दौराच करायचा असेल तर त्यांनी पाहणी दौरा करण्याऐवजी पाणी दौरा करावा...दिव्यातील जनतेला हक्काचे पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात का मिळत नाही याचा दौरा करावा... प्रश्न सोडवावा... दिव्यातील पाच लाख लोकं आयुक्तांना धन्यवाद देतील!

खरं तर पालिका आयुक्तांनी असा पाहणी दौरा करून फारसा फरक पडेल असे चित्र नाही. काल आयुक्तांनी दौरा केला आणि आज सगळं चकाचक होईल ही अपेक्षाच फोल आहे. पालिका आयुक्तांच्या दौऱ्यातील काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेतले तर किती दिरंगाई दिव्यातील प्रश्न सोडविण्यासाठी होते याची प्रचिती येईल. दिवा पूर्व पश्चिम उड्डाणपूल मागील ५वर्षाहून अधिक काळ रखडला आहे. तेव्हाच्या शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्या हस्ते या उड्डाणपूल चे भूमिपूजन झाले आणि आताच्या शिवसेनेचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळातही हा ब्रीज पूर्णत्वास जाऊ शकला नाही.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३ पान : ४
www.diwanews.com

## राज्यात 'वाचन चळवळ' उभी करणार – मंत्री केसरकर

**माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन**

**मुंबई :** माजी राष्ट्रपती दिवंगात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी मंत्रालय येथे डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. यावेळी वाचन संस्कृती रुजण्यासाठी आणि वाढविण्यासाठी राज्यात लवकरच 'वाचन चळवळ' उभी करणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी केले.

दिवा न्यूज

# वर्धापन दिन व दिवाळी विशेषांक-२०२३




# बदलता दिवा

## व्हिजन २०२४

६ नोव्हेंबर २०२३ रोजी
विशेषांक प्रसिद्ध होणार

दिवा न्यूज वर्तमानपत्राने बघता बघता तिसऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आणि वाचकांच्या पसंतीस उतरलेले दिवा न्यूज वर्तमानपत्र मागील दोन वर्षे विनाखंड प्रकाशित होत राहिले. दिवा न्यूज चा हा प्रवास असाच सुरू राहणार आहे. नागरी समस्या,सामान्य जनतेचे प्रश्न, प्रशासन व शासनाची भूमिका, राजकीय सामाजिक उपक्रम याच बरोबर वैचारिक भूमिका मांडणारे वर्तमानपत्र म्हणून दिवा न्यूजने आपली ओळख निर्माण केली आहे. सर्वसमावेशक असणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त व दिवाळी अंकाच्या निमित्ताने 'बदलता दिवा व्हिजन २०२४' हा विशेषांक प्रसिद्ध करत आहे. या विशेषांकात जाणकारांचे लेख, मुलाखती प्रसिद्ध होणार आहेत. नागरिकांच्या मतांनाही प्रसिद्धी दिली जाणार आहे. रंगीत व आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध होणाऱ्या या विशेषांकास आपली सदिच्छा व शुभेच्छा जाहिरात मिळावी ही विनंती!

### जाहिरातीचे दर

| | | |
|---|---|---|
| • फुल पेज कलर | – | १५ हजार रुपये |
| • हाफ पेज कलर | – | ८ हजार रूपये |
| • पाव पान कलर | – | ५ हजार रुपये |
| • शुभेच्छा जाहिरात | – | २ हजार रुपये |

– व्यवस्थापक, दिवा न्यूज



**जाहिरातीससाठी संपर्क:– मो: ९७७३३५३०८०**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३ पान : ५
www.diwanews.com

## भारत २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी सज्ज – पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई :** 'खेळ हे पदक जिंकण्यासाठी नसतात. तर खेळातून हृदय जिंकले जाते. खेळात जगाला जोडण्याची क्षमता असते असे सांगून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत २०३६ मधील ऑलिंपिक स्पर्धेच्या संयोजनासाठी सज्ज असल्याची निःसंदिग्ध ग्वाही दिली. त्यांनी २०२९ मध्ये होऊ घातलेल्या युवा ऑलिंपिक स्पर्धेच्या संयोजनाची तयारी दर्शवली. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या १४१ व्या अधिवेशनाचे प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन झाले.

# दिव्यातील खाजगी हॉस्पिटलच्या मनमानी कारभाराचे मनसेकडून वाभाडे

प्रति,
**मा.श्री.अभिजित बांगर**
आयुक्त, ठाणे महानगरपालिका
ठाणे – ४००६०२

**विषय :– दिव्यातील सर्व खाजगी रुग्णालयांचे ऑडिट करून त्यांच्या बिलिंग सिस्टीम तपासण्यासंदर्भात**

सन्माननीय महोदय,

दिवा शहरातील बहुतांश सर्वच खाजगी रुग्णालयांच्या बाबतीत नेहमीच आमच्या कार्यालयात वरचेवर तक्रारी येत असतात. दिवा शहरातील खाजगी रुग्णालयांकडून होणारी सर्वसामान्य जनतेच्या लूट हा मोठा चिंतेचा विषय आहे. दिव्यात महानगरपालिकेचे रुग्णालय अथवा आरोग्यकेंद्र नसल्याने सर्वसामान्य लोकं ही याच खाजगी हॉस्पिटलचा आधार घेत असतात. आज दिव्यात राहणारी बहुतांश जनता ही मध्यमवर्गीय आणि गरीब आहे त्यामुळे खाजगी रुग्णालयांच्या या लुटीचा थेट परिणाम हा या मध्यमवर्गावर दिसून येतो.

चारच दिवसांपूर्वी दिव्यातील आधार रुग्णालयासंदर्भात आमच्या सहकाऱ्यांनी मा. उपायुक्त श्री.उमेश बिरारे (आरोग्य विभाग) आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतना नितीन के. यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. हे पत्र सोबत पुढे जोडत असून, सदर प्रकरणात तक्रारकर्ते श्री.प्रवीण मोरे यांना मेडिक्लेम साठी लागणारी विस्तृत बिलाची प्रत() मिळवण्यासाठी डॉ. निलेश सरोदे आणि डॉ. सुनीता सरोदे या डॉक्टर दाम्पत्याकडून च्या नावाखाली रुग्णाच्या नातेवाईकांकडून ३०% रक्कम जास्तीची रक्कम उकळण्याच्या प्रकार उघडकीस आला. रुग्णालयाला लागत नसल्याचे आमच्या पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर दाम्पत्याच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी लगेच यु-टर्न घेऊन आयकर () लागत असल्याचे सांगितले तसेच तो न दिल्यास विस्तृत बिल मिळणार नाही असे देखील निक्षून सांगितले. इतक्यावरच न थांबता सदर डॉक्टर महाशयांनी बिनदिक्कतपणे लेखी स्वरूपात हे लिहून देखील दिले. म्हणजे आपलं कोणी काहीच वाकडं करू शकणार नाही याचा त्यांना असलेला विश्वास विचार करायला लावणारा आहे.

रुग्णालयांना लागत नसल्याचे माहिती असूनसुद्धा केवळ आपले खिसे भरण्यासाठी रुग्णांकडून जास्तीचे पैसे उकळले जातायत. सर्वसामान्य लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांना उलटसुलट चुकीचे कायदे दाखवून लोकांची अक्षरशः लुबाडणूक दिव्यातील खाजगी रुग्णालयांकडून केली जात आहे.

दिव्यातील अनेक रुग्णालयांमध्ये हॉस्पिटलच्या नावाखाली चार बेड टाकून फक्त लोकांना लुटायचे काम सुरू आहे. लोकांना औषधे त्यांच्याच हॉस्पिटल मधून घ्यायची सक्ती केली जाते. दिव्यातील एकही हॉस्पिटलमध्ये आग प्रतिबंधात्मक उपाययोजना असलेली दिसून येणार नाही. बेडचे आकारले जाणारे दर, हे तर ठाण्याच्या ज्युपिटर हॉस्पिटललाही लाजवतील असे आहेत. कित्येक रुग्णालयांमधील डॉक्टरांकडे योग्य पदवीही नसेल अशी ठाम शक्यता आहे. त्यामुळे या सर्व बाबींची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी वरील विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण आरोग्य विभागाला तसे चौकशीचे आदेश द्यावेत ही विनंती.

आपला नम्र,
**तुषार भास्कर पाटील**



(पान १ वरून)

खाजगी रुग्णालय दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांची कशा पद्धतीने लूट करतात याचा पाढा तुषार पाटील यांनी मांडला. एका खाजगी हॉस्पिटल मधील सरोदे नामक डॉक्टर दांपत्याच्या बाबत मोरे नामक रुग्णांनी मेडिक्लेम साठी पक्के बिल मागितल्यानंतर सदर दांपत्याने जीएसटी व इन्कम टॅक्स च्या नावाखाली ज्यादा रक्कम मागितल्याच्या संदर्भात केलेल्या तक्रारीचे उदाहरण देत डॉक्टरांच्या बेलगाम कारभारावर चाप लावण्याची मागणी तुषार पाटील यांनी या पत्राद्वारे पालिका आयुक्तांकडे केली.

याबाबत मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिवा न्यूज शी संपर्क साधून दिव्यात सामान्य रुग्णांची होणारी हेळसांड व डॉक्टरांकडून मनमानी पद्धतीने आकारली जाणारी फी व काही रुग्णालयाकडून मेडिक्लेम साठी पक्के बिल देण्यासंदर्भात केली जाणारी टाळाटाळ याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी बोलताना तुषार पाटील यांनी दिव्यातील खाजगी हॉस्पिटलच्या कारभाराची तपासणी होणे गरजेचे असून आरोग्य विभागाने निर्देशित केलेले नियम येथील रुग्णालय पाळतात का? याची चौकशी पालिकेच्या आरोग्य विभागाने करावी अशी मागणी पालिका आयुक्तांकडे लेखी पत्राद्वारे केल्याचे सांगितले. खरंतर पत्रकारांनी पीडित रुग्णाची बाजू मांडणे अपेक्षित असताना काही पत्रकार अशा प्रकरणांचा गैरफायदा घेत असल्याची खंत देखील तुषार पाटील यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.पत्रकारिता ही समाज हितासाठी असावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दिव्यातील आरोग्याच्या गंभीर प्रश्नावर पत्रकारांनी भाष्य करावे व असा प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना पाठबळ द्यावे असेही ते यावेळी म्हणाले.

**टीप:– मनसेचे तुषार पाटील यांनी पालिका आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून दिलेल्या पत्राची कॉपी व सदर पत्रातील मजकूर जसाच्या तसा छापत आहोत...**

# दिव्यात भाजपने घातले तलावाचे श्राद्ध



**दिवा:**–दिवा स्टेशनच्या बाजूला असणाऱ्या तलावाच्या दुरवस्थेबाबत भारतीय जनता पार्टीने महापालिकेचे लक्ष वेधण्यासाठी या तलावाच्या दुरवस्थेचा निषेध करताना तलावाचे श्राद्ध घालत अनोखे आंदोलन केले.दिवा पूर्वेकडील या तलावाची दुरावस्था झाली असून तलावाच्या सुशोभीकरणासाठी मंजूर झालेला निधी गेला कुठे? असा सवाल भाजपने या आंदोलन दरम्यान विचारला आहे. यावेळी भाजपचे मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, महिला मंडळ अध्यक्ष ज्योती पाटील, ठाणे जिल्हा सचिव विजय भोईर, रेशमा पवार, रोशन भगत, सपना भगत, समीर चव्हाण यांसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३


www.diwanews.com

## 'छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महोत्सवाचे डिसेंबरमध्ये आयोजन

**मुंबई :** देशी खेळांना प्रोत्साहन मिळावे तसेच पारंपरिक क्रिडा प्रकार जपले जावेत यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात डिसेंबर २०२३ मध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रिडा महोत्सव' आयोजित केला जाणार आहे. महोत्सवाचे नियोजन देशी मैदानी क्रीडा संघटनांनी समन्वय साधून काटेकोरपणे करावे, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

# ठाणे महानगरपालिकेने टाकलेल्या आरक्षणा विरोधात आगासन गावातील स्थानिक ग्रामस्थ आक्रमक,लढा तीव्र करण्याचा ग्रामस्थांचा सभेच्या माध्यमातून निर्धार

**आगासन:–** आगासन गावात ठाणे महानगरपालिकेने टाकलेल्या विविध आरक्षणा विरोधात आगासन गाव संघर्ष समितीच्या वतीने रविवारी संध्याकाळी एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे महापालिकेने आगासन येथील भूखंडांवर विविध सुविधांचे आरक्षण टाकले असून यामध्ये प्रभाग समिती कार्यालय, पोलीस स्टेशन,अग्निशमन दलाचे कार्यालय,रुग्णालय, गार्डन यासारखी विविध आरक्षण टाकण्यात आली आहेत. नुकतेच ठाणे महानगरपालिका प्रशासनाने आगासन गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे पोलीस बंदोबस्तात सर्वेक्षण केले. ग्रामस्थांचा विरोध असताना जबरदस्तीने झालेल्या सर्वेक्षणामुळे आगासन मधील नागरिकात तीव्र नाराजी आहे. संपूर्ण दिवा शहरातील विविध सुविधांची आरक्षण एकाच जागी का?असा प्रश्न आगासन गावातील स्थानिकांनी विचारला आहे.आगासन गावातील ग्रामस्थांनी आपल्या जमिनी अनेक वर्ष जोपासल्या त्या मोकळ्या ठेवल्या त्या ठिकाणी ते शेती करतात, त्या ठिकाणी त्यांनी बांधकाम केली नाहीत म्हणून त्यांनाही शिक्षा दिली जाते का? असा प्रश्न यावेळी सभेला संबोधित करताना रोहिदास मुंडे यांनी उपस्थित केला. या सभेमध्ये आरक्षणा हटवण्याचा लढा तीव्र करण्याचा निर्धार आगासन गावातील ग्रामस्थांनी केला त्याचबरोबर जोपर्यंत आगासन गावातील महापालिकेने टाकलेले अन्यायकारक आरक्षण हटवले जात नाही तोपर्यंत स्थानिक ग्रामस्थ याचा तीव्र विरोध करतील असा निर्धार या सभेत करण्यात आला. या सभेला प्रमुख पाहुणे संतोषजी केणे साहेब, मधुकर माळी, तानाजी पाटील, रोहिदास मुंडे (अध्यक्ष), तसेच आगासन गाव संघर्ष समिती आगासन गावातील स्थानिक ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.












दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३
पान : ७
www.diwanews.com

## हरविलेल्या मुली, महिलांना परत मिळविण्यात पोलिसांना यश

**मुंबई :** राज्यात ०५ महिन्यांत २९ हजार मुली व महिला बेपत्ता झाल्याचे वृत्त विविध माध्यमांतून प्रसारीत झाले आहे. पण, पोलीस विभागामार्फत प्राप्त माहितीनुसार यात तथ्य नसल्याचे दिसून आले आहे. राज्यात यावर्षी मे, २०२३ पर्यंत अपहरण झालेल्या मुलींपैकी ६८.९३ टक्के मुली परत मिळाल्या असून हरविलेल्या महिलांपैकी ६३.१० टक्के महिला परत मिळाल्या आहेत, अशी माहिती महाराष्ट्र पोलीस विभागाच्या महिला व बाल अपराध प्रतिबंध शाखेने दिली आहे.

# पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडून दिव्याचा पाहणी दौरा

*दिवा:- दिवा शहरात सुरू असणाऱ्या विविध विकास कामांचा पाहणी दौरा पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केला. यावेळी कल्याण ग्रामीणचे आमदार राजू पाटील व दिवा शिवसेनेचे माजी नगरसेवक उपस्थित होते.*







शहरातील अनेक विकास काम रखडलेली असून ही कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी या दौऱ्या दिल्या.दिवा पूर्व व दिवा पश्चिमला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. त्याचबरोबर दिवा पश्चिमेतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी मंजूर असलेली पुशिंग पद्धतीची पाण्याची लाईन टाकण्याचं काम सुरू करावे, दिवा स्टेशन ते एन.आर. नगर रस्ता तसेच दिवा स्टेशन पूर्व ते दातिवली स्मशानभूमी रस्ता, रिलायन्स टॉवर रस्ता तसेच पाण्याचा रिमोल्डिंग प्रकल्प, मंजूर दिवा-शिळ पाईप लाईन काम व पाण्याच्या टाक्यांची कामे इत्यादी अनेक महत्त्वकांक्षी प्रकल्पांवर आजच्या या दौऱ्यात चर्चा करण्यात आली.दौऱ्या दरम्यान प्रत्यक्ष पाहणी करून ही सर्व कामे युद्ध पातळीवर सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत अशी सूचना आयुक्तांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.यावेळी मनसेचे आमदार राजू पाटील,माजी उपमहापौर रमाकांत मढवी,माजी नगरसेवक शैलेश पाटील,अमर पाटील,आदेश भगत,तुषार पाटील,उमेश भगत,दीपक जाधव,निलेश पाटील,प्रशांत गावडे,भालचंद्र भगत यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.







## मनसे आमदार राजू पाटील व शिवसेनेचे माजी नगरसेवक यांच्या उपस्थितीत पाहणी दौरा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि.१६ ऑक्टोबर २०२३




## भाजपचे माजी मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांचा



## हल्ला बोल

# हा तर पाच वर्षांच्या अपयशाचा पाहणी दौरा

**दिवा:–** आयुक्तांनी दिव्यातील शिंदे गटाचे तथाकथित नेते मढवी आणि त्यांच्या अन्य नगरसेवकांच्या मागील पाच वर्षाच्या अपयशाचा पाहणी दौरा केला, असा घनाघात भाजपचे माजी मंडळ अध्यक्ष व सेव्ह दिवा फाउंडेशनचे अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी आयुक्तांच्या दौऱ्यावर बोलताना केला आहे.

दिवा शहरात नागरि सुविधांची महत्वाची कोणतीच कामे मागील पाच वर्षात मार्गी लागली नाहीत हेच आयुक्तांच्या पाहणी दौऱ्यातून स्पष्ट होते. दिवा पूर्व- पश्चिम ब्रिज, त्याचबरोबर पाण्याचा प्रश्न, पाणी वितरणासाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या,पाणी रीमॉडेलिंग योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या नव्या पाईपलाईन अद्याप सुरू नसल्याने नागरिकांना पाणीटंचाई भेडसावते. मुख्यमंत्र्यांनी पाणी योजनेचे उद्घाटन करून ही अद्याप जनतेला पुरेसे पाणी मिळत नाही. मग पाण्यासाठीचा निधी गेला कुठे असा प्रश्न ही रोहिदास मुंडे आणि विचारला आहे. दिव्यातील कचरा समस्या, गटारांची समस्या, फेरीवाल्यांचा प्रश्न, वाहतूक कोंडी अशा अनेक प्रश्नांवर सत्ताधारी शिंदे गटाचे माजी नगरसेवक अपयशी ठरल्याचे या पाहणी दौऱ्यातून आयुक्तांच्या लक्षात आले असेल असा सणसणीत टोला भाजपचे माजी मंडल अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी लगावला आहे.



## ५ वर्षे रखडलेली कामे....




- दिवा पूर्व पश्चिम उड्डाणपूल मार्गी लागला नाही
- दिव्यातील पाणी प्रश्न सुटला नाही
- पाणी योजनेचे उदघाटन झाले मात्र लोकांना प्यायला पुरेसे पाणी नाही
- गटारे आणि सांडपाणी वाहून नेण्याची यंत्रणा कार्यन्वित झाली नाही
- कचरा समस्या निकालात निघाली नाही
- रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला नाही